मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पवना धरणातून 400 क्युसेक्सने विसर्ग सुरू

## पाणलोट क्षेत्रात संततधार; नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोणावळा मावळ परिसरात पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात संततधार पाऊस चालू आहे. धरण सध्या ७२ टक्के भरले असून धरणामध्ये मोठा येवा प्राप्त होत आहे. तरी, धरणातील पाणीसाठा नियंत्रित करण्यासाठी आज (दि.०५) दुपारी १२ वाजल्यापासून सांडव्याद्वारे नदीपात्रामध्ये नियंत्रित पद्धतीने मुक्त विसर्ग करण्यात आला आहे.



प्रथम सांडव्यावरील विसर्ग ४०० क्युसेक्स इतका राहणार असून, सदरील विसर्ग हा दि.१५ जुलै पर्यंत चालू राहणार आहे. पाणलोट क्षेत्रातील पावसाच्या प्रमाणानुसार व येव्यानुसार धरणातून नदीपात्रात होणारा विसर्ग कमी/जास्त होण्याची शक्यता आहे अशी माहिती पवना धरण पूरनियंत्रण कक्षाच्या वतीने देण्यात आली आहे.

पवना धरण पूरनियंत्रण कक्षाने म्हटले आहे की, पवना नदी काठच्या सर्व नागरीकांना सूचित करण्यात येत आहे, की पवना धरण सद्यस्थितीमध्ये ७२ टक्के भरलेले आहे. पाणलोट क्षेत्रात पाऊस चालू असून धरणामध्ये मोठा येवा प्राप्त होत आहे.

तरी, धरणातील पाणीसाठा नियंत्रित करणेकरिता आज (दि.०५) दुपारी १२ वाजल्यापासून सांडव्याद्वारे नदीपात्रामध्ये नियंत्रित पद्धतीने मुक्त विसर्ग करण्यात येणार आहे. प्रथम सांडव्यावरील विसर्ग ४०० क्युसेक्स इतका राहणार असून, सदरील विसर्ग हा दि.१५ जुलै पर्यंत चालू राहणार आहे. पाणलोट क्षेत्रातील पावसाच्या प्रमाणानुसार व येव्यानुसार धरणातून नदीपात्रात होणारा विसर्ग कमी/जास्त होण्याची शक्यता आहे.

तरी पवना नदी काठच्या सर्व नागरीकांना सूचित करण्यात येते की, कृपया कोणीही नदीपात्रात उतरू नये. नदी मधील पाण्याचे पंप, नदी काठचे शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास ती तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावीत. सखल भागातील संबंधित नागरिकांना सूचना देण्यात याव्यात, सर्वांनी योग्य ती खबरदारी व दक्षता घेत जलसंपदा विभागास व प्रशासनास सहकार्य करावे असे आवहन करण्यात आले आहे.

# मौजे डुडुळगाव येथील वन विभागाच्या हद्दीतील रस्त्याला 'गती'

## रस्ता हस्तांतरणासाठी अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष पाहणी; आमदार लांडगे यांचा पाठपुरावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा अंतर्गत मौजे डुडुळगाव येथील वन विभागाच्या हद्दीतील रस्ता विकसित करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडे हस्तांतरित करावा लागणार आहे. यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पाठपुरावा केला आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी नुकतेच या रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यामुळे वन विभागाच्या हद्दीतील रस्त्याच्या कामाला गती मिळेल, असे चित्र आहे.



> मौजे डुडुळगाव येथील वन विभागाच्या हद्दीतील रस्ते आणि पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी आण्णाभाऊ साठे नगर येथील नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेता वन विभागाच्या हद्दीत असलेला रस्ता महानगरपालिका प्रशासनाकडे विकासासाठी हस्तांतरीत करावा. यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेतली. प्रशासनाकडून स्थळपाहणी केल्यानंतर रस्ता हस्तांरणाची प्रक्रियेला गती देता येईल.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

मौजे डुडुळगाव येथील वन विभागाच्या हद्दतील रस्ते आणि पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी महापालिका प्रशासनाने हस्तांतरित करावेत, अशी मागणी आमदार लांडगे यांनी सातत्याने लावून धरली आहे. राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीमध्ये पुण्यात बैठक झाली. त्यावेळी मंत्री महोदय यांनी याबाबत सकारात्मक कार्यवाहीचे आदेश दिले होते.

वन विभागाकडून डुडुळगाव येथील गट नं. १९० (चऱ्होली फाटा ते डुडुळगाव) मधील मंजूर विकास योजनेतील २४ मीटर रस्ता विकसित करण्यसाठी ०.८३२१ हे. क्षेत्र हस्तांतरीत करण्यात येणार आहे. तसेच, गट.नं.७८ पै. (तळेकर पाटील चौक ते साईनाथ चौक) येथील मंजूर विकास योजनेतील १८ मीटर रस्ता विकसित करण्यासाठी ०.५२१ हे. क्षेत्र मागणी केली आहे. त्यासाठी वनक्षेत्राचा दर्जा व क्षेत्राचा तपशील, या हद्दीतील कोणतीही न्यायालयीन प्रक्रिया, वनभंग, संभाव्य वृक्षतोड, अभयारण्य, संरक्षित क्षेत्र, इको सेन्सेटिव्ह झोन आदी बाबींचा स्वयंस्पष्ट अहवाल तयार करण्यात येणार आहे. तो अहवाल उप वनसंरक्षण यांना पाठवण्यात येणार आहे. त्यासाठी सदर पाहणी करण्यात आली.

यावेळी वन विभाग, महानगरपालिका स्थापत्य विभागाचे उप अभियंता सुशीलकुमार लवटे, सल्लागार रेवननाथ साखरे, वन परिक्षेत्र अधिकारी राजू वरक, वन परिमंडळ अधिकारी शितल खेंडके, वन रक्षक अशोक गायकवाड, वन मजूर लक्ष्मण टिंगरे, आमदार लांडगे यांचे सहकारी अनिकेत गायकवाड आदी उपस्थित होते.

# पुलांचे संरचनात्मक लेखापरीक्षण

## शहरात एकूण 86 मोठे, तर 170 लहान पूल; 1 कोटीच्या प्रस्तावाला स्थायी समितीची मंजुरी

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील विविध भागांत असलेल्या पुलांची संरचनात्मक लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करण्यासाठी सल्लागार म्हणून 'स्ट्रक्टॉनिक कन्सल्टिंग इंजिनिअर्स' यांना काम देण्यास शुक्रवारी स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. कंपनीने सर्वांत कमी दराने १ कोटी १८ लाखांमध्ये काम करण्याची तयारी दाखविल्याने त्यांना हे काम देण्यात आले.



शहरात एकूण ८६ मोठे, तर १७० लहान पूल आहेत. त्यांपैकी केवळ ३८ पुलांचे संरचनात्मक लेखापरीक्षण करण्यात आले आहे. त्यांपैकी ११ पुलांच्या दुरुस्तीचे काम सुरू आहे. उर्वरित पुलांच्या संरचनात्मक लेखापरीक्षण करण्याच्या प्रस्तावाला स्थायी समितीने मंजुरी दिली.

शहरातून ४४ किलोमीटर लांब मुळा-मुठा नदी वाहते. या दोन्ही नद्यांमध्ये ब्रिटिशकालीन पूल आहेत. त्यात गेल्या काही वर्षांत नवीन पुलांची भर पडली आहे. वाहतूक सुरळीत करण्यासाठी शहराचे दोन्ही भाग जोडण्यासाठी महापालिकेच्या विकास आराखड्यात नव्याने पूल सुचविले आहेत. शहराचा वाढत असलेला विस्तार आणि दिवसेंदिवस गंभीर होत चाललेली वाहतुकीची समस्या यामुळे पुलांची संख्या वाढवून पर्यायी मार्ग तयार करण्याचे काम महापालिकेने हाती घेतले आहे. याबरोबरच शहरातील नवीन आणि जुन्या पुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे या पुलांचे संरचनात्मक लेखापरीक्षण करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

महापालिकेने २०१३-१४ मध्ये १८ नद्यांवरील पुलांचे, तर २०१८-१९ मध्ये १२ पूल आणि उड्डाणपुलांची संरचनात्मक तपासणी पूर्ण केली आहे. त्यानंतर शहरातील २० वर्षांपेक्षा जुन्या ३८ पुलांची तपासणी २०२१ मध्ये महापालिकेने केली.

### सर्व प्रकारच्या पुलांचा समावेश

» नदीवरील ३२ पूल, २० उड्डाणपूल, ९ रेल्वे उड्डाणपूल या प्रमुख पुलांची संख्या ६१ आहे. आतापर्यंत ३८ पुलांचे संरचनात्मक लेखापरीक्षण पूर्ण झाले आहे. उर्वरित पुलांचे संरचनात्मक लेखापरीक्षण करण्यात आलेले नाही. त्यामुळे महापालिकेने निविदा मागविली होती. यामध्ये १ कोटी १८ लाखांची निविदा सर्वांत कमी दराने आली होती.

# बलात्कार प्रकरणातील तक्रारीबाबत संभ्रम

## पीडित तरुणीचे मानसोपचारतज्ज्ञांकडून समुपदेशन केले जाणार; अमितेश कुमार

**पुणे | प्रतिनिधी**

कोंढव्यातील बलात्कार प्रकरणात तरुणीने दिलेल्या तक्रारीबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. याप्रकरणी पोलिसांनी ताब्यात घेतलेला संशयित तरुणीचा मित्र असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. पोलीस त्यामुळे अद्याप कोणत्याही अंतिम निष्कर्षाप्रत पोचले नसल्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शुक्रवारी स्पष्ट केले.




कोंढव्यातील एका उच्चभ्रू सोसायटीत बुधवारी (२ जुलै) एका संगणक अभियंता तरुणीवर बलात्कार झाल्याची घटना घडल्याची तक्रार पोलिसांकडे आली. 'एक तरुण कुरिअर कंपनीतील कर्मचारी असल्याची बतावणी करून घरात शिरला. त्याने तोंडावर स्प्रे मारून बेशुद्ध करून बलात्कार केला,' अशी फिर्याद कोंढवा पोलीस ठाण्यात तरुणीने दिली होती. त्यानंतर तरुणीने दिलेल्या वर्णनावरून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तपास सुरू केला. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी तपासावर देखरेख ठेवली होती. सुमारे ५०० पोलीस कर्मचारी या प्रकरणाचा तपास करत होते.

पोलिसांनी शुक्रवारी बाणेर भागातील एका संगणक अभियंत्याला याप्रकरणी ताब्यात घेतले. त्याची सखोल चौकशी करण्यात आली तेव्हा, अभियंता आणि फिर्यादी तरुणी एकमेकांना ओळखणारे असल्याचे स्पष्ट झाले. हा तरुण तिच्या घरी नेहमी यायचा. दोघे एकत्र फिरायलाही जात असत. त्यांचा दररोज परस्परांशी संपर्क होता, असे पोलिसांनी सांगितले.

### पोलीस तपासात काय?

» घटनेच्या दिवशी संशयित तरुण सायंकाळी सव्वासातच्या सुमारास सोसायटीत आला होता. त्यानंतर तो पावणेनऊच्या सुमारास बाहेर पडला. सोसायटीतील कॅमेऱ्यांनी त्याला टिपले होते. पोलिसांनी संशयित तरुणाविषयी विचारपूस केली, तेव्हा तरुणीने ओळख नाकारली. त्यामुळे पोलिसांचा संशय बळावला. त्यानंतर पोलिसांनी कोंढव्यातील सोसायटीपासून सीसीटीव्ही चित्रीकरण तपासण्यास सुरुवात केली.

» संशयित तरुण बाणेर भागात वास्तव्यास आहे. जवळपास ५५० ठिकाणचे चित्रीकरण तपासण्यात आले.

» पोलिसांनी संशयिताबाबत तरुणी राहत असलेल्या सोसायटीतील रहिवाशांकडे चौकशी केली. सीसीटीव्ही चित्रीकरणात आढळून आलेल्या तरुणाचे छायाचित्र रहिवाशांना दाखविले, तेव्हा तरुण तिच्या घरी आल्याचे उघडकीस आले.

» तरुणीला संशयिताचे छायाचित्र दाखविण्यात आले, तेव्हा तरुणी क्षणभर गोंधळून गेली. तेव्हा, वरिष्ठ अधिकाऱ्यांना संशय आला.

» तरुणीच्या कॅमेऱ्यात छायाचित्र सापडले होते. ते छायाचित्र तिने एका ॲपचा वापर करून 'एडिट' करून तरुणीने हा संदेश स्वतःच्या मोबाइलवर घेतल्याचे आढळले.

> अद्याप पोलीस कोणत्याही निष्कर्षाप्रत पोहोचलेले नाहीत. पीडित तरुणीचे मानसोपचार तज्ज्ञांकडून समुपदेशन केले जात आहे.
>
> **- अमितेश कुमार, पोलीस आयुक्त.**

# डीएमएस सिस्टीम ठप्प होऊनही अधिकारी निवांत

## दिवसभर वर्दळ अन् वाहतूककोंडी; खड्ड्यांमुळे वाढल्या अपघाताच्या घटना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेत ई-टपाल, डॉक्युमेंट मॅनेजमेंट सिस्टमद्वारे कागदपत्रांचे व्यवस्थापन करणारी प्रणाली (डीएमएस) विकसीत करण्यात आली आहे. या डीएमएस यंत्रणेवर तब्बल ११२ कोटी खर्च करण्यात येत आहेत. परंतू, महापालिकेतील सर्व शासकीय अभिलेख व दस्ताऐवज हा इलेक्ट्रॉनिक (संगणकीय) स्वरुपात जतन केले आहे. परंतू, निगडीच्या इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरचा विद्युत पुरवठा खंडीत झाल्याने महापालिकेचे सर्व कामकाज दोन दिवस ठप्प झाले होते.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने १ एप्रिल २०२५ पासून सुरू केलेली कागद व्यवस्थापन प्रणाली ( डीएमएस) कामकाज सुरु केले. महापालिकेच्या प्रशासनात पारदर्शकता व गतिमानता यावी, पेपरलेस कारभार होण्यासाठी ई-ऑफीस प्रणाली विकसित केली आहे. याकरिता स्मार्ट सिटी आणि महापालिकेकडून जीआयएस सक्षम ईआरपी प्रकल्पाद्वारे ३३ मॉड्यूल तयार केले.

परंतू, डीएमएस प्रणाली मंगळवार (दि.१) पासून ठप्प झाली आहे. महापालिकेचे सर्व कामकाज जागेवर थांबले आहे. केवळ तीन महिन्यात डीएमएस प्रणाली ठप्प झाल्याने ठेकेदार कंपनीवर अधिकारी संताप व्यक्त करत आहेत. या व्यवस्थेत अद्याप अनेक त्रूटी प्रलंबित असून सातत्याने अडचणी येत आहेत. प्रत्येक फाईलची कामाला विलंब लागत आहे. त्यामुळे डीएमएस असून अडचण, नसून खोळंबा अशी अवस्था झाली आहे.




### आयसीसीसीमुळे महापालिकेची कामे ठप्प

» पिंपरी-चिंचवडमध्ये स्मार्ट सिटीने इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर (आयसीसीसी) उभारण्यात आले आहे. यामध्ये शहरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेरे, शहरातील रस्ते, महत्त्वाचे चौक, गर्दीच्या ठिकाणांवर २४ बाय ७ लक्ष ठेवण्यात येत आहे. शहरातील कचरा उचलणाऱ्या सर्व वाहनांना जीपीएस यंत्रणेवरील वाहनांचे संनियंत्रण या कंमाड सेंटरच्या माध्यमातून केले जाते. त्याशिवाय महापालिकेच्या डीएमएस कामकाजाचे सर्व सर्व्हर, सॉफ्टवेअरदेखील या केंद्राशी जोडलेले आहेत. या केंद्राचा विद्युत पुरवठा खंडीत झाला. त्याशिवाय जनरेटरमध्ये डिझेल उपलब्ध नसल्याने डीएमएस यंत्रणेचे काम ठप्प झाले होते. त्यामुळे शहरातील आयसीसीसी हे जर बंद पडले तर शहरातील सर्व अनेक यंत्रणेशी निगडीत कामे ठप्प होण्याची शक्यता आहे.

### तरीही परिस्थिती 'जैसे थे'

» नवीन प्रणालीची अंमलबजावणी करताना ती कार्यप्रणाली समजून घेण्याच्या उद्धीष्टाने सुरूवातीला अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. यामध्ये कागदपत्रांचे व्यवस्थापन करणारी प्रणाली (डीएमएस) चे प्रशिक्षण देण्यात आले. डीएमएस प्रणालीमध्ये नस्त्या तयार करताना प्रत्यक्ष तांत्रिक अडचणी, त्रुटी असल्यास तसे निरिक्षण विभाग प्रमुखांनी लेखी स्वरूपात प्रशासन विभागास कळविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. विभाग प्रमुखांनी नोंदविलेल्या निरिक्षणाची पुर्तता मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांच्या मार्फत करण्यात आल्या. परंतू, डीएमएस प्रणालीत महापालिकेतील नागरिकांचा महत्त्वाचे दस्तऐवज फाईल, अभिलेखच्या सुरक्षेचे काय, ही यंत्रणा हॅकरने हॅक करुन नागरिकांच्या निगडीत सर्व अभिलेख, महत्वाचे दस्ताऐवज सुरक्षित राहणार का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

“ निगडीतील आयसीसीसी येथील सेंटरमधील विद्युत विषयक आणि तांत्रिक अडचण निर्माण झाली होती. विद्युत पुरवठा खंडीत झाला. याशिवाय जनरेटरमध्ये डिझेल ही नव्हते. त्यामुळे मंगळवारपासून डीएमएस प्रणाली बंद झाली होती. ही प्रणाली सुरू करण्यासाठी तांत्रिक उपाय योजना केल्या आहेत. गुरूवारी (दि.३) सायंकाळी ही प्रणाली सुरू होईल.

- किरणराज यादव, सह मुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट सिटी, पिंपरी-चिंचवड

# निविदा सहा कोटींची, पुरवठा आदेश दहा कोटींचा

## पालिकेच्या मोबाईल कॉम्पॅक्टर खरेदीत भांडार अधिकाऱ्याचा अजब कारभार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या भांडार विभागाकडून अभिलेख सुस्थितीत ठेवण्यासाठी ६ कोटी रुपयांचे मोबाईल कॉम्पॅक्टर रॅक खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. हे काम एकाच ठेकेदार कंपनीला डोळ्यासमोर ठेवून काढण्यात आले. त्यानुसार चार पात्र झालेल्या निविदांमध्ये मे. इंद्रनील टेक्नॉलॉजीज या कंपनीला काम मिळाले. परंतू, मोबाईल कॉम्पॅक्टरची निविदा ६ कोटींची असताना भांडार अधिकाऱ्याकडून ९ कोटी ५३ लाख ७४ हजार २३२ रुपयांचा पुरवठा आदेश देण्यात आला आहे. त्यामुळे भांडार अधिकाऱ्यांच्या मनमानी धोरणाची महापालिका वर्तुळात चर्चा सुरु आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध विभागाचे अभिलेख सुस्थितीत ठेवण्यासाठी भांडार विभागाकडून ६ कोटींचे मोबाईल कॉम्पॅक्टर रॅक खरेदी करण्यात येत आहे. महापालिकेच्या भांडार विभागाने मोबाईल कॉम्पॅक्टर रॅकचा साहित्याचा पुरवठा करण्यासाठी ई निविदा सूचना क्र.६३/२०२५-२६ ही १२ मार्च २०२५ ते २ एप्रिल २०२५ या कालावधीत प्रसिध्द केली. सुमारे ६ कोटी ६ लाख रुपयांची निविदा काढण्यात आली. महाटेंडर प्रणालीवर मनपाचे सर्व विभागासाठी आवश्यक मोबाईल कॉम्पॅक्टर रॅंक सिस्टीम पुरवठा करुन कार्यान्वित देण्यात येणार आहे. स्थापत्य व औद्योगिक प्रशिक्षण विभागाकडील स्पेसिफिकेशन प्रमाणे तयार करुन पुरवठा करण्यास निविदा प्रसिध्द झाली. यामध्ये चार निविदाधारक पात्र झाले. त्या निविदा पैकी मे. इंद्रनिल टेक्नॉलॉजीज, सांगवी यांचे एक ते १० बाबी प्रकारचे साईज मुव्हेबल रॅंक सिस्टीम करण्यास फिक्स युनिट, मुव्हेबल ड्राईव्ह आणि डोअर प्रति सेटसाठी निविदा लघूत्तम दर घेण्यात आलेले होते. महापालिकेच्या भांडार विभागाने ६ कोटीच्या कामांची निविदा एकाच ठेकेदाराच्या फायद्यासाठी काढली आहे. या निविदेत त्याच ठेकेदाराला पात्र करुन पुरवठा आदेश देताना ५ कोटी ८६ लाखाऐवजी तब्बल नऊ कोटी ५३ लाखा पुरवठा आदेश दिला आहे




### एकाच ठेकेदाराला डोळ्यासमोर ठेऊन निविदा प्रक्रिया

» निविदेतील दिलेले ड्राईंग व मोजमापानूसार प्रति सेट प्रमाणे एकूण ५ कोटी ८६ लाख ०९ हजार १४५ रुपये खर्च येणार होता. प्राप्त दर हे अंदाजपत्रकीय ६ कोटी ६ लाख ९६ हजार २२६ पेक्षा ३.४४ टक्के कमीने स्विकृत करण्यात आलेले आहेत. त्यानूसार मोबाईल कॉम्पॅक्टर रॅक सिस्टीम खरेदी मनपाच्या प्रस्तावित परीमाण रक्कमेनूसार ५ कोटी ८६ लाख ९ हजार १४५ रुपये मध्ये येणा-या खर्चास आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

# विधीमंडळात गाजली पुण्याची वाहतूक कोंडी

## ठोस उपाययोजनेची अपेक्षा असताना पदरी केवळ अधिकाऱ्यांवर कारवाईचे आश्वासन; सुनील कांबळे यांच्या लक्षवेधीनंतर सर्वच आमदारांनी मांडला प्रश्न

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात कायदा-सुव्यवस्था, नागरी आणि पायाभूत सुविधांपेक्षा वाहतुकीची समस्या अधिक डोकेदुखी वाढवणारी ठरली आहे. शहरातील अनेक प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासकीय स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. मात्र या प्रयत्नांपेक्षा वाहतुकीच्या समस्येत वाढ होण्याचा वेग अधिक आहे. सर्वसामान्य पुणेकरांना भेडसावणारी ही समस्या भाजप आमदार सुनील कांबळे यांनी गुरुवारी (दि. ३) विधीमंडळात लक्षवेधीद्वारे मांडली. कांबळे यांच्यापाठोपाठ पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या सर्वच आमदारांनी वाहतूक कोंडीकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यावर ठोस अशी उपाययोजना केली जाणे अपेक्षित असताना रस्त्यांवरील अतिक्रमणाकडे डोळेझाक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे सांगण्यात आले आहे.

भाजपचे पुण्यातील आमदार सुनील कांबळे यांनी वाहतुकीच्या प्रश्नावर विधानसभेत लक्षवेधी आणली होती. त्यांनी त्यांच्या पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघासह शहरातील विविध समस्यांसह वाहतुकी कोंडीच्या मुद्यावरून प्रश्न उपस्थित केला. शहरातील वाहतुकीची समस्या गंभीर होत असून वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना मनस्ताप होतो. शहरात वाहनांची भरमसाठ संख्या वाढलेली असताना पोलीस, महापालिका आणि आरटीओकडून या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचे कांबळे म्हणाले. तसेच, शहरात महापालिका रस्त्यांचे रुंदीकरण करत असली तरी त्यावर वारंवार अनधिकृत पार्किंग, अतिक्रमणे होतात. त्यामुळे, वाहतूक कोंडी होत असून अपघातांची संख्या वाढल्याने घरातून बाहेर पडलेली व्यक्ती परत येईल की नाही, अशी भिती नागरिकांमध्ये असते. या बाबत शासन काय करणार असा प्रश्नही कांबळे यांनी उपस्थित केला. त्यानंतर या विषयावर बोलण्यासाठी एकापाठोपाठ एक आमदारांची रांगच लागली.आमदार भीमराव तापकीर, राहुल कुल, हेमंत रासने या भाजप आमदारांसह शिवसेनेचे आमदार विजय शिवतारे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार बापूसाहेब पठारे यांनीही पुण्यातील वाहतुकीचे अनेक प्रश्न प्रश्न उपस्थित केले.



### शहरात वाहनांसाठी रस्ते अपुरे

» सध्या पुणे शहरातील रस्त्यांची लांबी सुमारे दोन हजार किलोमीटर आहे. गेल्या पाच वर्षांत त्यात अवघी ४०० किलोमीटरने वाढ झाली आहे. रस्त्यांची लांबी वाढली तरी रुंदी वाढलेली नाही. उलट सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या मध्य पुण्यात तर, नियोजित रस्ता रुंदी रद्द करण्याची किमया लोकप्रतिनिधींनी केली आहे. दरवर्षी या शहरात सुमारे तीन लाख नव्या वाहनांची भर पडते. म्हणजेच वाहनांना सध्या रस्ते अपुरे पडत आहेत. शहराचा विस्तार ४८७ चौरस किलोमीटर झाला आहे. शहरात गेल्या पाच वर्षांत ३४ गावे नव्याने समाविष्ट झाली आहेत. मात्र, त्या गावातील रस्त्यांच्या निर्मितीला अद्याप मुहूर्त लागलेला नाही. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीच्या बाहेर ३० किलोमीटरपर्यंत वेगाने नागरीकरण होत आहे. सक्षम सार्वजनिक वाहतूक नसल्यामुळे या नागरिकांना खासगी वाहनांचा वापर करावा लागतो.

### तरीही परिस्थिती 'जैसे थे'

» गेल्या काही दिवसांपासून पुण्यातील स्थिती पाहता वाहतुक कोंडीचा प्रश्न लवकर सुटेल यामध्ये शंका उपस्थित होते. कारण थोडासा पाऊस झाला, तरी पुण्यात ७०-८० ठिकाणी पाणी साचते, झाडाच्या फांद्या पडतात, मोठे खड्डे अशा अनेक समस्या नव्याने दिवसेंदिवस उद्भवत आहेत. तसेच, वाढत्या वाहन संख्येला सामावून घेण्याची रस्त्यांची क्षमता कमी पडत असल्याचे चित्र आहे. यासोबतच, सार्वजनिक वाहतूक सेवा अनुभवताना नागरिकांना अनेक समस्येला सामोर जावे लागत आहे. पुणे शहरातील वाहनांची संख्या प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील नोंदीनुसार ५० लाखांपेक्षा जास्त झाली आहे. या शहराची लोकसंख्या ६० लाखांवर पोचली आहे. पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्यातून रोज होणारी वाहतूक लक्षात घेता, पुण्याच्या रस्त्यांवर दररोज ७० लाखांपेक्षा नागरिकांचा वावर आहे. त्यामुळे शहरातील वाहतुकीचा प्रश्न कसा सुटणार?, असा प्रश्न नागरिकांच्या मनात उपस्थित होत आहे.

# माळेगावचे ५०० सभासद एआय तंत्रज्ञान राबविणार

## माळेगाव कारखाना कार्यस्थळावर ऊस उत्पादन वाढीकरीता कृत्रिम बुध्दीमत्ता (एआय) तंत्रज्ञान वापर करणेबाबत चर्चासत्र व प्रात्यक्षिक झाले.


**पुणे | प्रतिनिधी**

माळेगाव कारखाना कार्यस्थळावर ऊस उत्पादन वाढीकरीता कृत्रिम बुध्दीमत्ता (एआय) तंत्रज्ञान वापर करणेबाबत चर्चासत्र व प्रात्यक्षिक झाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनुसार कारखाना कार्यस्थळावर संचालकांसमवेत कृषी विज्ञान केंद्र शारदानगर येथील तज्ज्ञांचे मार्गदर्शनाखाली झालेल्या चर्चासत्रानुसार ऊस लागण हंगाम २०२५-२०२६ करिता कार्यक्षेत्रामधील प्राथमिक ५०० सभासदांकरीता ऊस पिकास कृत्रिम बुध्दीमत्ता (एआय) तंत्रज्ञान राबविण्याचे ठरले आहे.

कृषी विज्ञान केंद्र शारदानगर यांनी प्रायोगिक तत्वावर ऊस लागण हंगामामध्ये या तंत्रज्ञानाचा वापर करुन वेगवेगळ्या ऊस जातीची लागवड केली होती. त्यानुसार ऊस उत्पादनामध्ये ३० टक्क्यापर्यंत वाढ, ऊस उत्पादन खर्चामध्ये ३० टक्के बचत तसेच ४० टक्के पाण्याची बचत होण्यास मदत झाल्याचे निष्कर्ष मिळाले आहेत. तंत्रज्ञान वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, मांजरी बुद्रुक साखर संघ व कारखाना यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करुन कारखाना कार्यक्षेत्रामध्ये ही योजना राबविणेचे ठरविले आहे.

योजना प्राधान्याने सहभाग घेणाऱ्या प्राथमिक ५०० सभासदांकरिता राबविण्यात येणार आहे. तंत्रज्ञानाचा प्रती हेक्टरपर्यंत करीता खर्च रुपये २५ हजार रुपये असून त्यापैकी सहभागी सभासदाने रुपये ९ हजार रूपये भरावयाचे आहेत. सभासदाच्या वतीने कारखान्यामार्फत रुपये ६७५० रुपये जमा केले जाणार असून उर्वरित ९२५० रुपये वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट, मांजरी संस्थेमार्फत दिले जाणार आहेत. सॉईल सेन्सॉरमार्फत जमीनीतील आर्द्रतेची माहिती घेऊन पाण्याचे नियोजन त्याचबरोबर न्युट्रीयंट

चर्चासत्राकरिता माळेगाव कारखान्याचे विद्यमान चेअरमन केशवराव जगताप, व्हाईस चेअरमन राजेंद्र ढवाण, आजी माजी संचालक मंडळ, कार्यकारी संचालक अशोक पाटील, मुख्य शेतकी अधिकारी धनंजय लिंबोरे, मुख्य ऊस विकास अधिकारी सुरेश काळे व कारखान्याचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. विद्यमान चेअरमन केशवराव जगताप यांनी कारखान्याची वाढलेली गाळप क्षमता तसेच मर्यादित कार्यक्षेत्र याचा विचार करुन या तंत्रज्ञानाच्या वापराने कारखाना ऊस उपलब्धतेबाबत स्वयंपूर्ण होण्यास मदत होणार आहे, असे सांगितले.



### संभाव्य रोग व किडींवर वेळेत नियंत्रण होणार

» कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा कार्यक्षेत्रात वापर करुन ऊस उत्पादन वाढीकरीता संचालक मंडळाचे समवेत कृषि विज्ञान केंद्र शारदानगरचे तज्ज्ञ संतोष करंजे व तुषार जाधव यांनी प्रात्यक्षिक सादर करुन मार्गदर्शन केले. यात प्रामुख्याने वेदर स्टेशनचा वापर, वाऱ्याची दिशा व वेग तसेच वातावरणातील तापमान, पर्जन्यमानाची मिळणारी पूर्वसूचना यामुळे उसावरील संभाव्य रोग व किडींचा प्रादुर्भाव यांचे वेळेत नियंत्रण करणे सुलभ होणार आहे. सॉईल सेन्सॉरमार्फत जमीनीतील आर्द्रतेची माहिती घेऊन पाण्याचे नियोजन केले.